सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४४

# महाराष्ट्र पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९७१

(दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

**MAHARASHTRA ACT No. XLIV OF 1971**

# THE MAHARASHTRA VETERINARY PRACTITIONERS ACT, 1971

**(As modified upto 9th November, 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत : ०८.८० रुपये]

S (II) 1205

# महाराष्ट्र पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९७१

## अनुक्रमणिका

उद्देशिका | पृष्ठ
कलमे

### भाग एक

### प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. १
२. व्याख्या .. १


### भाग दोन

### [महाराष्ट्र] पशुवैद्यक परिषद : स्थापना, रचना, सभा व कार्यरीती


३. परिषदेची स्थापना .. २
४. परिषदेची रचना .. २
५. निवडणूक न झाल्यास सदस्य नामनिर्देशित करणे .. ३
६. सदस्यांची निवडणूक .. ३
७. सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे; परिषदेची स्थापना .. ३
८. पदावधी .. ३
९. परिषदेच्या सभेची वेळ व ठिकाण .. ४
१०. परिषदेच्या सभांची कार्यरीती .. ४
११. सभेसाठी फी व भत्ते .. ४
१२. अनर्हता .. ४


### भाग तीन

### प्रबंधक व इतर अधिकारी व सेवक


१३. परिषदेच्या प्रबंधकाची नेमणूक, त्याची कर्तव्ये व कामे .. ५
१४. परिषदेचे इतर कर्मचारी .. ६


### भाग चार

### नोंदणी आणि परिषदेचे अधिकार व कर्तव्ये


१५. नोंदणीपुस्तक .. ६
१६. पहिले नोंदणीपुस्तक तयार करणे .. ६
१७. नोंदणीपुस्तकाची अभिरक्षा व परिरक्षण .. ७

## अनुक्रमणिका-चालू


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १८. | नोंदणी करण्याचा हक्क असलेल्या व्यक्ती .. | ७ |
| १९. | अपिले व चुकीच्या नोंदी खोडून टाकणे .. | ८ |
| २०. | नोंदणीपुस्तकातून नाव काढून टाकणे .. | ८ |
| २१. | नवीकरण फी .. | ८ |
| २२. | पशुवैद्यक व्यवसायींनी प्रमाणपत्रे देणे .. | ९ |
| २३. | नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी विवक्षित पदे धारण करणे .. | ९ |
| २४. | मृत्यूची नोटीस .. | ९ |
| २५. | पशुवैद्यक व्यवसायींची वार्षिक यादी .. | ९ |
| २६. | परिषदेला माहिती मागविण्याचा व परीक्षेच्या वेळी हजर राहण्याचा प्राधिकार असणे. | १० |
| २७. | फीचा विनियोग .. | १० |


### भाग पाच

### अपराध व शास्ती


| | | |
|---|---|---|
| २८. | या अधिनियमान्वये नोंदणी न केलेल्या पशुवैद्यक व्यवसायींनी पशुवैद्यकीय प्रमाणपत्रावर सही करता कामा नये किंवा ते अधिप्रमाणित करता कामा नये. | १० |
| २९. | कोणत्याही व्यक्तीच्या नावापुढे कोणतीही उपाधी, वर्णन, वगैरे जोडण्यास, तसे करण्याचा त्यास सक्षम प्राधिकार असल्याखेरीज मनाई करणे. | ११ |
| ३०. | कलम २८ किंवा २९ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबद्दल शास्ती .. | ११ |
| ३१. | नोंदणी झाली असल्याचा खोटा दावा केल्याबद्दल शास्ती .. | ११ |
| ३२. | या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यास सक्षम असलेले न्यायालय. | ११ |

## अनुक्रमणिका-चालू


कलमे पृष्ठ

### भाग सहा

### नियंत्रण

३३. अनुसूचीत नमूद केलेल्या अर्हतेच्या यादीतील फेरफार .. १२

३४. राज्य शासनाची निदेश देण्याची व वैधरीत्या नेमण्यात किंवा रचना करण्यात न आलेल्या प्राधिकरणांच्या जागी नवीन प्राधिकरणे नेमण्याचा अधिकार. १२

### भाग सात

### संकीर्ण

३५. या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तींना क्षतिपूर्ती .. १३

३६. प्रबंधक आणि इतर कर्मचारी हे लोकसेवक असणे .. १३

३७. नियम .. १३

३८. विनियम .. १३

### भाग आठ

### रद्द करणे आणि संक्रमणकालीन तरतूद

३९. रद्द करणे .. १४

४०. नियम इत्यादी चालू राहणे, अधिकार, कर्तव्ये इत्यादी निहित होणे .. १४

अनुसूची. .. १६





S (H) 1205-1a

## सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४[1]

# महाराष्ट्र पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९७१

[१५ नोव्हेंबर १९७१]

**या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे फेरफार व सुधारणा करण्यात आल्या**

**सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (१४-४-१९७६)[2]**

**महाराष्ट्र राज्यात पशुवैद्यक व्यवसायींची नोंदणी करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात पशुवैद्यक व्यवसायींची नोंदणी करण्यासाठी व यात यापुढे दिलेल्या इतर विवक्षित प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बावीसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## भाग एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९७१ असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास तो अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** संदर्भावरून दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(१) "नेमलेला दिवस" याचा अर्थ ज्या [3][दिनांकास] या अधिनियमान्वये, महाराष्ट्र पशुवैद्यक परिषद यथोचित रीत्या घटित करण्यात आली असेल किंवा घटित झाल्याचे मानण्यात येईल तो दिनांक असा आहे;

(२) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्र पशुवैद्यक परिषद असा आहे;

---

१. उद्देश व कारणे यांच्या विवरणासाठी १९७१ चा महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग पाच, अतिरिक्त, पृष्ठ क्रमांक ४०७ पहा.

२. अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

३. २६ जानेवारी १९७२ (शासकीय अधिसूचना, पशु व वाणिज्य विभाग, क्रमांक व्हीपीए-१०७१/१३०९७-एल, दिनांक १ जानेवारी १९७२).

(३) "संचालक" याचा अर्थ, पशुसंवर्धन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे असा आहे;

(४) "सदस्य" याचा अर्थ, परिषदेचा सदस्य असा आहे;

(५) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(६) "अध्यक्ष" याचा अर्थ, परिषदेचा अध्यक्ष असा आहे;

(७) "नोंदणी पुस्तक" याचा अर्थ, कलम १५ अन्वये ठेवण्यात आलेले पशुवैद्यक व्यवसायींचे नोंदणी पुस्तक असा आहे;

(८) "नोंदणी झालेला पशुवैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, नोंदणी पुस्तकामध्ये ज्याचे नाव त्यावेळी नोंदण्यात आले असेल असा पशुवैद्यक व्यवसायी असा आहे;

(९) "प्रबंधक" याचा अर्थ, कलम १३ अन्वये नेमलेला प्रबंधक असा आहे;

(१०) "नोंदणी अधिकारी" याचा अर्थ, कलम १६ अन्वये नेमलेला नोंदणी अधिकारी असा आहे;

(११) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची असा आहे.

## भाग दोन

## [1][महाराष्ट्र] पशुवैद्यक परिषद : स्थापना, रचना, सभा व कार्यरीती

परिषदेची स्थापना.

**३.** (१) राज्य शासन, पहिले नोंदणी पुस्तक तयार झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र पशुवैद्यक परिषद या नावाने ओळखली जाणारी एक परिषद स्थापन करील.

(२) पशुवैद्यक व्यवसाय, पशुवैद्यक शिक्षण व राज्यातील पशुसंवर्धनाचा विकास या संबंधातील सर्व धोरणविषयक बाबींवरील राज्य शासनाचे सल्लागार मंडळ म्हणूनही परिषद काम करील.

परिषदेची रचना.

**४.** (१) परिषद पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(क) संचालक, पदसिद्ध;

(ख) राज्यातील प्रत्येक पशुवैद्यक महाविद्यालयाचे प्राचार्य, पदसिद्ध;

(ग) नोंदणी झालेल्या पशुवैद्यक व्यवसायींनी आपल्यामधून निवडून द्यावयाचे चार सदस्य;

(घ) राज्यातील ज्या विद्यापीठात पशुवैद्यकशास्त्राचे शिक्षण, अध्यापन किंवा प्रशिक्षण यांची तरतूद केलेली असेल अशा प्रत्येक विद्यापीठातून, विद्यापीठाच्या अधिसभेच्या किंवा यथास्थिति, विधिसभेच्या सदस्यांनी, आपल्यामधून निवडून द्यावयाचा एक पशुवैद्यक प्रतिनिधी (पशुवैद्यक महाविद्यालयाच्या प्राचार्याव्यतिरिक्त);

---

[1]. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३, द्वितीय अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ङ) नोंदणी झालेल्या पशुवैद्यक व्यवसायींमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोनापेक्षा अधिक नसतील इतके सदस्य.

(२) संचालक हा, परिषदेचा अध्यक्ष असेल.

**५.** कलम ४, पोट-कलम (१), खंड (ग) किंवा खंड (घ) अन्वये कोणताही सदस्य निवडून आला नाहीतर, राज्य शासनास त्या कलमाच्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नोंदणी झालेल्या पशुवैद्यक व्यवसायींचा प्रतिनिधी म्हणून अशा सदस्यास नामनिर्देशित करता येईल, आणि अशा रीतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, कलम ४, पोट-कलम (१), खंड (ग) किंवा यथास्थिति, खंड (घ) अन्वये यथोचित रीत्या निवडण्यात आल्याचे समजण्यात येईल. निवडणूक न झाल्यास सदस्य नाम-निर्देशित करणे.

**६.** कलम ४, पोट-कलम (१), खंड (ग) खालील पशुवैद्यक व्यवसायींची निवडणूक ही, परिषदेस याबाबतीत विनियमाद्वारे तरतूद करता येईल अशा वेळी आणि अशा ठिकाणी आणि अशा रीतीने घेण्यात येईल : सदस्यांची निवडणूक.

परंतु, अशा सदस्यांची पहिली निवडणूक, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याबाबतीत निश्चित करील अशावेळी आणि अशा ठिकाणी व अशा रीतीने घेण्यात येईल.

**७.** सर्व सदस्य निवडून आल्यानंतर व नामनिर्देशित करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य शासन, अशा सर्व सदस्यांनी नावे, **राजपत्रात** प्रसिद्ध करील, आणि सर्व सदस्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर परिषद यथोचित रीत्या प्रस्थापित झाल्याचे समजण्यात येईल. सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे; परिषदेची स्थापना.

८. (१) अध्यक्षाव्यतिरिक्त परिषदेचे सदस्य, त्याच्या निवडणुकीच्या किंवा नामनिर्देशनाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीपर्यंत किंवा त्याचे उत्तराधिकारी यशोचित रीत्या निवडून येईपर्यंत किंवा नामनिर्देशित होईपर्यंत—यापैकी जी मुदत अधिक असेल त्या मुदतीपर्यंत पद धारण करतील, आणि ते, यथास्थिति, पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केले जाण्यास पात्र असतील : पदावधी.

परंतु, खंड (ख) खाली येणारा किंवा कलम ४, पोट-कलम (१), खंड (घ) अन्वये निवडून आलेला सदस्य, राज्यातील पशुवैद्यक महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा विद्यापीठाच्या अधिसभेचा किंवा, यथास्थिति, विधिसभेचा सदस्य असेल तोपर्यंत, पद धारण करील.

(२) निवडून आलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही सदस्यास, अध्यक्षास उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा राजीनामा, अध्यक्षास तो ज्या दिनांकास मिळेल त्या दिनांकापासून अंमलात येईल.

(३) सदस्याच्या मृत्यूमुळे, राजीनाम्यामुळे किंवा अन्यथा परिषदेच्या कोणत्याही सदस्याची जागा त्याच्या पदाचा अवधी समाप्त होण्यापूर्वी रिकामी होईल तर, अशी जागा, कलम ४, पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार भरण्यात येईल, आणि ज्या सदस्यांच्या जागी अशी व्यक्ती नेमण्यात आली असेल, तो सदस्य ज्या मुदतीसाठी निवडण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आला असेल त्या मुदतीच्या उर्वरित कालासाठी पद धारण करील.

(४) सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी कोणत्याही सदस्यास परिषदेकडून अनुपस्थिती रजा मंजूर करता येईल.

परिषदेच्या सभेची वेळ व ठिकाण.

**९.** विनियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशावेळी व ठिकाणी परिषदेची सभा भरविण्यात येईल आणि परिषदेची प्रत्येक सभा, विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा रीतीने बोलाविण्यात येईल:

परंतु, असे विनियम करण्यात येईपर्यंत, अध्यक्षाने, त्यास इष्ट वाटेल अशावेळी व ठिकाणी, प्रत्येक सदस्यास पत्र पाठवून परिषदेची सभा बोलाविणे विधिसंमत असेल.

परिषदेच्या सभांची कार्यरीती.

**१०.** (१) अध्यक्ष, परिषदेच्या प्रत्येक सभेत अध्यक्ष म्हणून काम चालवील. अध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपस्थित सदस्य, अध्यक्षांचे काम चालविण्यासाठी आपल्यामधून एक सदस्य निवडतील.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याच्याव्यतिरिक्त, परिषदेच्या सभेतील सर्व प्रश्नांचा सभेला उपस्थित असलेल्या बहुसंख्य सदस्यांच्या मतानुसार, निर्णय करण्यात येईल. पाच सदस्यांची मिळून गणपूर्ती होईल. सभेसाठी निश्चित केलेल्या वेळेपासून तीस मिनिटांच्या आत गणपूर्ती, झाली नसेल त्याबाबतीत, पीठासीन प्राधिकारी, परिषदेच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर, तो अधिसूचित करील अशा कोणत्याही पुढील दिवसाच्या वेळेपर्यंत सभा तहकूब करील; आणि मूळ सभेमध्ये, गणपूर्ती झाली असती तर, त्या सभेपुढे जे कामकाज आले असते ते कामकाज अशा रीतीने तहकूब करण्यात आलेल्या सभेपुढे मांडण्यात येईल आणि ते अशा सभेत किंवा त्यानंतर तहकूब करण्यात आलेल्या सभेत, मग उक्त सभेत गणपूर्ती झालेली असो वा नसो—निकालात काढण्यात येईल.

(३) परिषदेच्या प्रत्येक सभेत, त्यावेळी असलेल्या अध्यक्षास किंवा अध्यक्षांचे काम करणाऱ्या कोणत्याही सदस्यास, समसमान मते पडतील त्यावेळी परिषदेचा सदस्य म्हणून त्यास असलेल्या मताशिवाय, दुसरे किंवा निर्णायक मत देता येईल.

(४) परिषदेत कोणतेही पद रिकामे आहे, किंवा तिच्या रचनेत कोणताही दोष आहे किंवा रजेवर असल्यामुळे किंवा अन्यथा कोणताही सदस्य अनुपस्थित आहे याच केवळ कारणावरून परिषदेचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज हे अवैध असल्याचे समजण्यात येणार नाही.

सभेसाठी फी व भत्ते.

**११.** नियमांद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून सदस्यांना विहित करण्यात येईल असा खर्च देण्यात येईल.

अनर्हता.

**१२.** (१) कोणतीही व्यक्ती—

(क) जर ती अमुक्त नादार असेल,

(ख) जर ती विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने तिला विकल मनाची म्हणून घोषित केले असेल,

(ग) तिचे नाव नोंदणी पुस्तकातून काढण्यात आले असेल आणि ते परत नोंदण्यात आले नसेल, किंवा

(घ) ती परिषदेची सर्वकालिक अधिकारी किंवा सेवक असेल,

तर अशी व्यक्ती, सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नामनिर्देशित केली जाण्यास आणि सदस्य असण्याचे चालू राहण्यास, अनर्ह ठरेल.

(२) अध्यक्ष व पशुवैद्यक महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या व्यतिरिक्त परिषदेचा कोणताही सदस्य परिषदेच्या परवानगीशिवाय, परिषदेच्या लागोपाठच्या तीन सर्वसाधारण सभांना अनुपस्थित राहील तर, परिषदेस त्याची जागा रिकामी झाल्याचे तात्काळ घोषित करता येईल आणि संबंधित सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याप्रमाणे, अशी घोषणा अंमलात येईल.

(३) जर कोणताही सदस्य, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अनर्हतांपैकी कोणत्याही प्रकारे अनर्ह होईल किंवा अनर्ह झाल्याचे आढळून येईल तर, परिषद, राज्य शासनाकडे अहवाल सादर करील, आणि अनर्हतांबाबत खात्री झाली तर, राज्य शासन, त्याचे पद रिकामे झाल्याचे घोषित करील.

## भाग तीन

## प्रबंधक व इतर अधिकारी व सेवक

परिषदेच्या प्रबंधकाची नेमणूक, त्याची कर्तव्ये व कामे.

**१३.** (१) परिषद, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने प्रबंधकाची नेमणूक करील.

(२) परिषदेस, वेळोवेळी, प्रबंधकास रजा मंजूर करता येईल :

परंतु, रजेचा कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक नसेल तर, अध्यक्षास रजा मंजूर करता येईल.

(३) रजेमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे, प्रबंधकाचे पद तात्पुरते रिकामे झाल्याच्या अवधीत परिषद, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने त्या जागी काम करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक करील, आणि अशा रीतीने नेमण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ही, अशा नेमणुकीच्या मुदतीत, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ प्रबंधक असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, जागा अशा रीतीने रिकामी असल्याचा कालावधी, एक महिन्यापेक्षा अधिक नसेल तेव्हा अध्यक्षास नेमणूक करता येईल, आणि तो अशा नेमणुकीबद्दल परिषदेला व राज्य शासनाला तात्काळ कळवील.

(४) परिषदेस, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने प्रबंधक म्हणून नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस निलंबित करता येईल, बडतर्फ करता येईल किंवा काढून टाकता येईल किंवा तिच्यावर कोणतीही इतर कमी प्रमाणातील शास्ती लादता येईल.

(५) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, प्रबंधकाचे वेतन आणि भत्ते व सेवेच्या इतर शर्ती या विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(६) प्रबंधक हा, परिषदेचा सचिव व कार्यकारी अधिकारी असेल. तो परिषदेच्या सभांना उपस्थित राहील आणि अशा सभांना उपस्थित असलेल्या सदस्यांच्या नावांचे व सभांच्या कामकाजाचे कार्यवृत्त ठेवील.

(७) विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रबंधकाकडून परिषदेचे लेखे ठेवण्यात येतील.

(८) प्रबंधकास, कर्मचारीवर्गावर विहित करण्यात येतील असे पर्यवेक्षी अधिकार असतील आणि त्यास, या अधिनियमात तरतुदी करण्यात येतील त्याप्रमाणे किंवा विहित करण्यात येतील त्याप्रमाणे इतर कर्तव्ये व इतर कामे पार पाडता येतील.

परिषदेचे इतर कर्मचारी.

**१४.** (१) परिषदेस, या अधिनियमानुसार किंवा तदन्वये आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, प्रबंधकाव्यतिरिक्त, इतर अधिकाऱ्यांची व सेवकांची नेमणूक करता येईल :

परंतु, अशा अधिकाऱ्यांची व सेवकांची संख्या व पदनामे आणि त्यांचे वेतन व भत्ते या गोष्टी परिषदेकडून निर्धारित करण्यात येतील.

(२) परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या सेवेच्या इतर शर्ती (शिस्तविषयक बाबींच्या तरतुदी धरून) विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## भाग चार

## नोंदणी आणि परिषदेचे अधिकार व कर्तव्ये

नोंदणीपुस्तक.

**१५.** (१) राज्य शासन, शक्य तितक्या लवकर, राज्यासाठी पशुवैद्यक व्यवसायींचे नोंदणीपुस्तक तयार करण्याची व्यवस्था करील.

(२) राज्य शासन निदेश देईल अशा नमुन्यात नोंदणीपुस्तक तयार करण्यात येईल व तदनंतर त्याचे परिरक्षण करण्यात येईल. नोंदणीपुस्तकामध्ये या अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव, पत्ता व अर्हता संपादन केली असेल तो दिनांक आणि ज्या दिनांकास ती अर्हता धारण केली त्या दिनांकाचा त्यात समावेश असेल.

पहिले नोंदणीपुस्तक तयार करणे.

**१६.** (१) पहिले नोंदणीपुस्तक तयार करण्याच्या प्रयोजनार्थ राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नोंदणी अधिकारी म्हणून एखाद्या अधिकाऱ्याची नेमणूक करता येईल.

(२) राज्य शासन, त्याच किंवा तत्सम अधिसूचनेद्वारे, ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकापूर्वी नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणीसाठी अर्ज करता येईल तो दिनांक नेमील.

(३) नोंदणी अधिकारी, नेमलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी, मिळालेल्या प्रत्येक अर्जाची तपासणी करील, आणि विहित रीतीने अशी चौकशी केल्यानंतर कलम १८ खालील नोंदणीस अर्जदार पात्र आहे याबद्दल त्याची खात्री झाली असेल तर, तो, पोट-कलम (४) च्या तरतुदींना अधीन राहून, अर्जदाराचे नाव नोंदणीपुस्तकात नोंदण्याचा निदेश देईल.

१९५३ चा मुंबई ६७.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिवशी, मुंबई पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५३ अन्वये ठेवलेल्या नोंदणीपुस्तकात ज्याचे नाव नोंदलेले असेल अशा प्रत्येक पशुवैद्यक व्यवसायीचे नाव, त्याला तसा अर्ज द्यावा न लागता परंतु विहित करण्यात येईल अशी, नावे नोंदणीपुस्तकात ठेवण्याबद्दलची फी देण्यास फर्मावून या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या नोंदणीपुस्तकात नोंदण्यात येईल.

(५) अशा रीतीने तयार करण्यात आलेले नोंदणीपुस्तक त्यानंतर राज्य शासन निदेश देईल त्यारीतीने प्रसिद्ध करण्यात येईल.

**१७.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, परिषदेची प्रथम रचना करण्यात आल्यावर हे नोंदणीपुस्तकात राज्य शासनाकडून परिषदेच्या अभिरक्षेत देण्यात येईल आणि पहिल्या नोंदणीपुस्तकातील नोंदणीसाठी असलेली अर्जाबद्दलची सर्व फी किंवा तिचा विनिर्दिष्ट भाग परिषदेच्या खाती जमा करण्यात यावा, असा राज्य शासन निदेश देईल. राज्य शासन ज्या दिनांकास नोंदणीपुस्तक परिषदेच्या अभिरक्षेत दिले असेल तो दिनांक **राजपत्रात** अधिसूचित करील. नोंदणी पुस्तकाची अभिरक्षा व परिरक्षण.

(२) प्रबंधक, शक्य असेल तेथवर नोंदणीपुस्तक बिनचूक ठेवील आणि नोंदलेल्या व्यवसायींच्या अर्हता किंवा पत्ता यामधील महत्त्वाच्या फेरफाराची नोंद त्यास वेळोवेळी त्या नोंदणीपुस्तकात करता येईल. निवर्तलेल्या किंवा कलम २० अन्वये ज्यांची नावे नोंदणीपुस्तकातून काढून टाकण्यासंबंधी निदेश देण्यात आले असतील अशा सर्व नोंदलेल्या व्यवसायींची नावे नोंदणीपुस्तकातून काढून टाकण्यात येतील.

(३) अतिरिक्त अर्हतेसंबंधीच्या नोंदीमध्ये करावयाचा कोणताही फेरफार, राज्य शासनाकडून त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशी कोणतीही फी दिल्याशिवाय, करण्यात येणार नाही, असा निदेश राज्य शासनास देता येईल.

**१८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, अनुसूचीत समाविष्ट असलेल्या अर्हतांपैकी कोणतीही अर्हता धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस, अर्ज केल्यावर, विनियमाद्वारे विहित करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर आणि नोंदणीचा हक्क प्राप्त करून देणारी अर्हता धारण करीत असल्याबद्दल नोंदणी अधिकाऱ्याची किंवा, यथास्थिति, प्रबंधकाची खात्री पटेल असा पुरावा दिल्यानंतर आपले नाव नोंदवून घेण्याचा हक्क असेल. नोंदणी करण्याचा हक्क असलेल्या व्यक्ती.

(२) राज्य शासनास, नोंदणी अधिकाऱ्याशी किंवा, यथास्थिति, परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, एखादी व्यक्ती नोंदणीपुस्तकात नाव नोंदण्याचा हक्क प्राप्त करून देणाऱ्या अर्हता धारण करीत नसली तरीही, या प्रयोजनासाठी केलेल्या विनियमाद्वारे तरतूद करण्यात येतील अशा शर्तीवर महाराष्ट्र राज्यात ती व्यक्ती खरोखरच पशुवैद्यकीय व्यवसाय करीत असेल तर, अशा व्यक्तीचे नाव नोंदणीपुस्तकात नोंदण्यास, परवानगी देता येईल.

(३) भारतातील इतर कोणत्याही राज्यांच्या पशुवैद्यक परिषदेत, अशा राज्यात पशुवैद्यक व्यवसायींच्या नोंदणीसाठी अंमलात असेल अशा कोणत्याही विधिअन्वये, त्या त्या वेळी ज्या व्यक्तींची नोंदणी झालेली असेल अशा प्रत्येक व्यक्तीस, जर अशा परिषदेबरोबर उभयपक्षी नोंदणीची व्यवस्था करण्यात आली असेल, तर त्या बाबतीत अर्ज केल्यावर विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर आणि यथास्थिति, नोंदणी अधिकारी किंवा प्रबंधक यास, उक्त विधिअन्वये तिच्या नोंदणीचा दिनांक कळविल्यानंतर, आणि तिच्या अर्हता व त्या तिला देण्यात आल्याचे दिनांक यासंबंधी बिनचूक तपशील कळविल्यानंतर, या अधिनियमान्वये नाव नोंदण्याचा हक्क असेल.

१८९८ चा ५. (४) ज्या कोणत्याही व्यक्तीस फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे दखली अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल किंवा जी सैनिक विधीस अधीन असल्यामुळे किंवा जिल्हा त्या विधीच्या अधीन करण्यात आल्यामुळे सेना अधिनियम किंवा भारतीय सेना
१९५० चा ४६. अधिनियम, १९११ किंवा सेना अधिनियम, १९५० अन्वये, अशा रीतीने व्याख्या केल्याप्रमाणे दखल अपराधाबद्दल जिला दोषी ठरविण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीची आणि योग्य ती

चौकशी केल्यानंतर, कोणत्याही व्यवसायासंबंधात अश्लाघ्य वर्तनाबद्दल जिला परिषदेकडून दोषी ठरविण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीची या अधिनियमान्वये नोंदणी करण्याचे नाकारता येईल.

अपिले व चुकीच्या नोंदी खोडून टाकणे.

**१९.** (१) ज्या कोणत्याही व्यक्तीस तिच्या नावाची नोंदणी किंवा नोंदणीपुस्तकातील कोणतीही नोंद यासंबंधात नोंदणी अधिकाऱ्याने किंवा प्रबंधकाने दिलेल्या निकालामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटत असेल अशा व्यक्तीस,—

(क) नोंदणी अधिकाऱ्याच्या निकालाविरुद्ध राज्य शासनाकडे, आणि

(ख) प्रबंधकाच्या निकालाविरुद्ध परिषदेकडे

अपील करता येईल.

(२) (क) राज्य शासनाकडे करावयाचे अपील कलम १६ च्या पोट-कलम (५) अन्वये पहिले नोंदणीपुस्तक प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आणि रुपये ५ इतकी फी देऊन दाखल केले पाहिजे; आणि

(ख) परिषदेकडे करावयाचे अपील, विनियमांत विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशी फी देऊन दाखल केले पाहिजे आणि परिषदेने विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा रीतीने त्याचा निर्णय केला पाहिजे.

(३) पहिल्या नोंदणीपुस्तकाच्या बाबतीत राज्य शासनास, आणि इतर बाबतीत परिषदेला, स्वत: होऊन किंवा कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावर रीतसर व योग्य चौकशी करून आणि संबंधित व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर नोंदणीपुस्तकातील कोणतीही नोंद लबाडीने करण्यात किंवा करविण्यात आली असल्याविषयी राज्य शासनाची किंवा यथास्थिति, परिषदेची खात्री होईल तर, अशी नोंद रद्द करता येईल किंवा तीत फेरफार करता येईल.

नोंदणी पुस्तकातून नाव काढून टाकणे.

**२०.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे दखली अपराधाबद्दल जिला दोषी ठरविण्यात आले असेल आणि जी सैनिक विधीस अधीन असल्यामुळे किंवा जिला त्या विधीच्या अधीन करण्यात आल्यामुळे सेना अधिनियम किंवा भारतीय सेना अधिनियम, १९११ किंवा सेना अधिनियम, १९५० या अन्वये, अशा रीतीने व्याख्या केल्याप्रमाणे दखली अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल किंवा जिला परिषदेकडून योग्य चौकशी करून कोणत्याही व्यवसायासंबंधात अश्लाघ्य वर्तनाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल अशा कोणत्याही पशुवैद्यक व्यवसायींचे नाव परिषदेस नोंदणीपुस्तकातून काढून टाकता येईल आणि अशा रीतीने काढून टाकलेले कोणतेही नाव पुन्हा दाखल करण्याविषयी निदेश देता येईल.

१८९८ चा ५.

१९५० चा ४६.

नवीकरण फी.

**२१.** (१) कलम १८ किंवा २५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिषदेस प्रत्येक पशुवैद्यक व्यवसायीने आपले नाव नोंदणीपुस्तकात चालू राहण्याकरिता राज्य शासन मंजूर करील अशी नवीकरणाची फी दिली पाहिजे, असा निदेश देता येईल.

(२) जर नवीकरणाची फी परिषदेने याबाबतीत ठरविलेल्या दिनांकापूर्वी दिली नाही तर प्रबंधक कसूरदाराचे नाव नोंदणीपुस्तकातून काढून टाकील :

परंतु, अशा रीतीने काढून टाकलेले नाव, फी दिल्यानंतर, परिषद निदेश देईल अशा रीतीने अशा शर्तीस अधीन राहून, पुन्हा नोंदणीपुस्तकात दाखल करता येईल.

**२२.** कोणत्याही पशुवैद्यक व्यवसायीकडून किंवा पशुवैद्यक अधिकाऱ्याकडून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीनुसार किंवा त्यान्वये आवश्यक असलेले कोणतेही प्रमाणपत्र, त्यावर सही करणारी व्यक्ती या अधिनियमान्वये नोंदलेली असल्याखेरीज, वैध असणार नाही. पशुवैद्यक व्यवसायींनी प्रमाणपत्रे देणे.

**२३.** कोणत्याही व्यक्तीने, राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय, तिची या अधिनियमान्वये नोंदणी झालेली नसेल तर, स्वखुशीने दिलेल्या वर्गणीने सर्वस्वी चालविण्यात येत नसलेल्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही पशुवैद्यकीय रुग्णालयात, दवाखान्यात किंवा धर्मार्थ चिकित्सालयात किंवा कोणतीही सार्वजनिक संस्था, निकाय किंवा परिसंस्था यात पशु-चिकित्साविषयक कामे करण्यासाठी कोणतेही पद धारण करता कामा नये. नोंदणी न झालेल्या व्यक्तींनी विवक्षित पदे धारण करणे.

**२४.** मृत्यूची नोंदणी करणारा प्रत्येक प्रबंधक, नोंदलेल्या पशुवैद्यक व्यवसायीच्या मृत्यूची नोटीस मिळाल्यानंतर, मृत्यूची वेळ व जागा यांच्या तपशिलासह, अशा मृत्यूचे एक प्रमाणपत्र आपल्या सहीनिशी डाकेने प्रबंधकाला ताबडतोब पाठवील आणि त्यास, आपल्या कार्यालयाचा खर्च म्हणून अशा प्रमाणपत्रांचा व तो पाठविण्याचा खर्च आकारता येईल. मृत्यूची नोटीस.

**२५.** (१) प्रबंधक, दर पाच वर्षांनी एकदा परिषद ठरवील त्या दिनांकास किंवा तत्पूर्वी त्या त्या वेळी नोंदणीपुस्तकात दाखल केलेल्या सर्व व्यक्तींची नावे व अर्हता आणि अशा अर्हता ज्या दिनांकास प्राप्त करण्यात आल्या ते दिनांक नमूद केलेली, नोंदलेल्या व्यक्तींच्या आडनावानुसार वर्णनुक्रमाने तयार केलेली एक बिनचूक यादी मुद्रित करण्याची व ती प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील. पशुवैद्यक व्यवसायींची वार्षिक यादी.

(२) प्रबंधक, परिषद निश्चित करील अशा दिनांकास किंवा तत्पूर्वी.—

(क) नोंदणीपुस्तकात त्या त्या वेळी नोंदलेल्या किंवा पुन्हा नोंदलेल्या आणि पूर्वीच मुद्रित व प्रसिद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही विद्यमान यादीत समाविष्ट नसलेल्या सर्व व्यक्तींची नावे;

(ख) कोणत्याही कारणास्तव ज्यांची नावे नोंदणीपुस्तकातून काढून टाकण्यात आली आहेत व पुन्हा नोंदविण्यात आली आहेत अशा कोणत्याही विद्यमान यादीत समाविष्ट असलेल्या सर्व व्यक्तींची नावे; आणि

(ग) विद्यमान यादीत इतर कोणत्याही सुधारणा दर्शविणारे पोट-कलम (१) खालील यादीचे पूरकपत्र किंवा शुद्धिपत्र दरवर्षी मुद्रित करण्याची व प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

(३) पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध करावयाच्या यादीचा नमुना, त्यात समाविष्ट करावयाचा तपशील आणि तिच्या प्रसिद्धीची रीतही विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) पोट-कलम (१) अनुसार मुद्रित व प्रसिद्ध करण्यात आलेली नावांची व अर्हतेची यादी ही, सर्व बाबतीत (विरुद्ध सिद्ध करून दाखविण्यात येत नाही तोवर), तीत ज्यांची नावे असतील अशा व्यक्ती रीतसर नोंदलेल्या आहेत या विषयीचा पुरावा असेल; आणि अशा यादीत आढळून न येणारे कोणत्याही व्यक्तीचे नाव हे (विरुद्ध सिद्ध करून दाखविण्यात येत नाही तोवर) अशी व्यक्ती नोंदलेली नाही या विषयींचा पुरावा असेल :

परंतु, अशा यादीत जिचे नाव आढळून येत नाही त्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, अशा व्यक्तीचे नाव नोंदणीपुस्तकात नोंदल्याबद्दलची प्रबंधकाच्या सहीची प्रमाणित प्रत ही अशी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नोंदलेली आहे याविषयीचा पुरावा असेल.

परिषदेला माहिती मागविण्याचा व परीक्षेच्या वेळी हजर राहण्याचा प्राधिकार असणे.

२६. परिषदेला, कोणत्याही पशु-महाविद्यालयाच्या किंवा शाळेच्या किंवा इतर परिसंस्थेच्या नियामक मंडळाला किंवा प्राधिकरणाला आणि अनुसूचीत समाविष्ट असलेल्या किंवा समाविष्ट होण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही परीक्षक मंडळाला.—

(क) कोणतीही पशु-वैद्यकीय अर्हता देण्यासंबंधात अशा मंडळाने किंवा प्राधिकरणाने किंवा अशा महाविद्यालयात किंवा शाळेत किंवा परिसंस्थेत नेमलेल्या कोणत्याही अभ्यासक्रमासंबंधाने किंवा घेतलेल्या परीक्षेसंबंधाने परिषदेला आवश्यक असेल ती माहिती पुरविण्यास सांगण्याचा, आणि

(ख) परिषदेने या बाबतीत नेमलेल्या परिषदेच्या कोणत्याही सदस्यास अशा कोणत्याही परीक्षेच्या वेळी हजर राहण्याची अनुमती देण्यास व उपस्थित राहण्यास सांगण्याचा प्राधिकार असेल.

फीचा विनियोग.

२७. या अधिनियमान्वये परिषदेस फी म्हणून मिळालेल्या सर्व रकमा, राज्य शासन याबाबतीत करील त्या नियमांनुसार, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी उपयोजिल्या जातील.

## भाग पाच

## अपराध व शास्ती

या अधिनियमान्वये नोंदणी न केलेल्या पशुवैद्यक व्यवसायींनी पशुवैद्यकीय प्रमाणपत्रावर सही करता कामा नये किंवा ते अधिप्रमाणित करता कामा नये.

२८. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या भाग चार अन्वये नोंदलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीने,—

(क) यथोचितरीत्या अर्हताप्राप्त असलेल्या पशुवैद्यक व्यवसायीने कोणत्याही विधीन्वये किंवा नियमान्वये ज्यावर सही करणे किंवा जे अधिप्रमाणित करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही पशुचिकित्साविषयक किंवा शारीरिक सुदृढतेसंबंधीच्या प्रमाणपत्रावर सही करता कामा नये किंवा ते अधिप्रमाणित करता कामा नये.

(ख) उक्त व्यक्ती भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२, यातील कलम ४५ अन्वये पशुवैद्यकशास्त्रासंबंधी कोणत्याही बाबतीत तज्ज्ञ म्हणून पुरावा देण्यास पात्र असणार नाही.

**२९.** कोणत्याही व्यक्तीने, ती पशुवैद्यकशास्त्राच्या कोणत्याही पद्धतीने व्यवसाय करण्यासाठी असलेली अर्हता म्हणून एखादी पदवी, पदविका, अनुज्ञप्ती किंवा प्रमाणपत्र प्रत्यक्षपणे धारण करीत आहे असे दर्शविणारा किताब, वर्णन, अक्षरे किंवा संक्षेप :— कोणत्याही व्यक्तीच्या नावापुढे कोणतीही उपाधी, वर्णन, वगैरे जोडण्यास, तसे करण्याचा त्यास सक्षम प्राधिकार असल्याखेरीज मनाई करणे.

(क) तो अशी पदवी, पदविका, अनुज्ञप्ती किंवा प्रमाणपत्र प्रत्यक्षपणे धारण करीत असेल ते खेरीजकरून—

आणि

(ख) अशी पदवी, पदविका, अनुज्ञप्ती किंवा प्रमाणपत्र अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले असेल किंवा भारतात किंवा त्याच्या कोणत्याही भागात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये मान्य केलेली असेल किंवा अशी पदवी, पदविका, अनुज्ञप्ती किंवा प्रमाणपत्र प्रदान करण्याची किंवा बहाल करण्याची किंवा देण्याची राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेल्या किंवा तसे करण्यास सक्षम म्हणून मान्यता दिलेल्या अधिकाऱ्याने प्रदान केलेले किंवा बहाल केलेले किंवा दिलेले असेल ते खेरीजकरून— आपल्या नावापुढे जोडता कामा नये.

**३०.** जी व्यक्ती, कलम २८ किंवा २९ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला पहिल्या दोषसिद्धी नंतर अडीचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतकी द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि नंतरच्या दोषसिद्धीच्या बाबतीत पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतकी द्रव्यदंडाची शिक्षा होईल. कलम २८ किंवा २९ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबद्दल शास्ती.

**३१.** जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये नोंदणी झाली असल्याची खोटी बतावणी करील किंवा या अधिनियमान्वये नोंदणी झालेली नसून आपल्या नावाबरोबर किंवा पदवीबरोबर आपण अशा रीतीने नोंदलेले आहोत असे दाखविणारे कोणतेही शब्द किंवा अक्षरे उपयोगात आणील तिला दोष, सिद्धी झाल्यानंतर तीनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतकी द्रव्यदंडाची शिक्षा होईल—मग अशा बतावणीमुळे किंवा असे शब्द किंवा अक्षरे वापरल्यामुळे कोणत्याही व्यक्तीची वस्तुतः फसगत झालेली असो अगर नसो. नोंदणी झाली असल्याचा खोटा दावा केल्याबद्दल शास्ती.

**३२.** इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या न्यायालयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमाखालील अपराधांची दखल घेता कामा नये किंवा न्याय-चौकशी करता कामा नये. या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यास सक्षम असलेले न्यायालय.

## भाग सहा

## नियंत्रण

अनुसूचीत नमूद केलेल्या अर्हतेच्या यादीतील फेरफार.

**३३.** परिषदेच्या प्रतिवृत्तावरून किंवा इतर रीतीने राज्य शासनास असे दिसून येईल की, अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या स्तंभ (३) मध्ये संक्षेपाक्षरे दिलेल्या अर्हता देणाऱ्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मधील परिसंस्थांपैकी कोणत्याही परिसंस्थेने नेमलेला अभ्यासक्रम आणि परीक्षा ही, अशी अर्हता मिळविणाऱ्या व्यक्तीच्या अंगी आपला व्यवसाय, कार्यक्षम रीतीने चालविता येण्यासाठी जरूर ते ज्ञान आणि कसब प्राप्त करून देण्यासारखी नाहीत किंवा परिषदेच्या प्रतिवृत्तावरून किंवा इतर रीतीने, राज्य शासनास असे दिसून येईल की, अनुसूचीत दाखल न केलेली अर्हता देणाऱ्या कोणत्याही परिसंस्थेने नेमलेला अभ्यासक्रम आणि परीक्षा ही, अशी अर्हता मिळविणाऱ्या व्यक्तींच्या अंगी, आपला व्यवसाय कार्यक्षम रीतीने चालविता येण्यासाठी जरूर ते ज्ञान आणि कसब प्राप्त करून देण्यासारखी आहेत तेव्हा, राज्य शासनाने वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, यथास्थिति, अनुसूचीत दाखल केलेली कोणतीही अर्हता मिळाल्यावरून, कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये नोंदणी केली जाण्याचा हक्क असणार नाही, असा निदेश देणे किंवा, यथास्थिति अनुसूचीत दाखल न केलेली कोणतीही अर्हता मिळाल्यावरून कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून अशा रीतीने नोंदविले जाण्याचा हक्क असेल असा निदेश देणे हे विधिसंमत असेल आणि त्यानंतर सदरहू अनुसूचीत त्याप्रमाणे सर्व प्रयोजनांसाठी फेरफार करण्यात आले आहेत, असे समजण्यात येईल.

राज्य शासनाची निदेश देण्याची व वैधरीत्या नेमण्यात किंवा रचना करण्यात न आलेल्या प्राधिकरणांच्या जागी नवीन प्राधिकरणे नेमण्याचा अधिकार.

**३४.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, आवश्यक असतील असे निदेश परिषदेस देता येतील आणि अशा निदेशांचे पालन करणे हे परिषदेचे कर्तव्य असेल. अशा रीतीने देण्यात आलेल्या निदेशांचे पालन करण्यात परिषद कसूर करील तर, राज्य शासनास, अशा निदेशांचे पालन करण्यासंबंधी आणि तो पार पाडताना आलेला खर्च, परिषदेच्या खाती जमा असलेल्या पैशातून देण्यासंबंधी निदेश देता येईल.

(२) राज्य शासनास कोणत्याही वेळी असे दिसून येईल की, एखादी परिषद किंवा इतर कोणतेही प्राधिकरण हे, या अधिनियमान्वये वैधरीत्या प्रस्थापित करण्यात किंवा नेमण्यात आलेले नाही तर, राज्य शासनास असा निदेश देता येईल की, उक्त परिषदेने किंवा अशा प्राधिकरणाने वापरावयाचे अधिकार किंवा पार पाडावयाची कर्तव्ये किंवा कामे ही, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, त्यास योग्य वाटेल अशा प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने, अशा रीतीने आणि अशा मुदतीपर्यंत, करावी किंवा पार पाडावीत.

## भाग सात

## संकीर्ण

**३५.** हा अधिनियम, नियम किंवा विनियम याअन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही. या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तींना क्षतिपूर्ती.

१८६० चा ४५. **३६.** या अधिनियमान्वये नेमण्यात आलेला परिषदेचा प्रबंधक आणि अधिकारी आणि सेवक भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. प्रबंधक आणि इतर कर्मचारी हे लोकसेवक असणे.

**३७.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आगाऊ प्रसिद्ध करून, नियम करता येईल. अशा नियमामध्ये, असे कोणतेही प्रयोजन पार पाडण्याकरिता फी देण्यासंबंधीची तरतूद अंतर्भूत असेल. नियम.

(२) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यासंबंधी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहाचे एकमत होईल तर अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**३८.** (१) परिषदेस, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीकरिता, या अधिनियमाशी किंवा कलम ३७, पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील— विनियम.

(क) कलम ६ अन्वये परिषदेच्या सदस्यांची निवडणूक ज्या वेळी आणि ज्या ठिकाणी आणि ज्या रीतीने घेण्यात येईल ती वेळ, ते ठिकाण आणि ती रीत;

(ख) कलम ९ अन्वये, परिषद आपल्या सभा ज्यावेळी आणि ज्या ठिकाणी आणि ज्या रीतीने भरवील ती वेळ आणि ते ठिकाण आणि ती रीत;

(ग) कलम १८, पोट-कलम (३) अन्वये, नोंदणी करून घेण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींच्या नोंदणीसाठी फी;

(घ) प्रबंधकाच्या निर्णयाविरुद्ध परिषदेकडे ज्या मुदतीच्या आत आणि ज्या रीतीने अपील सादर करण्यात येईल आणि कलम १९ अन्वये परिषदेकडून त्यांची सुनावणी करून निर्णय देण्यात येईल ती मुदत आणि ती रीत, अशा अपिलांसाठी देय असलेली फी;

(ङ) कलम २१ अन्वये, नवीकरणाची फी दिल्यानंतर, एखाद्या पशुवैद्यक व्यवसायींचे नाव नोंदणीपुस्तकात ज्या रीतीने आणि ज्या शर्तीस अधीन राहून, पुन्हा दाखल करण्यात येईल ती रीत आणि त्या शर्ती;

(२) सर्व विनियम, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(३) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणतेही विनियम रद्द करता येतील.

## भाग आठ

## रद्द करणे आणि संक्रमणकालीन तरतूद

रद्द करणे.

**३९.** नेमलेल्या दिवशी,—

(क) मुंबई पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५३ रद्द होईल;

(ख) अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये रचना केलेली मुंबई पशुवैद्यक परिषद विसर्जित होईल आणि त्या परिषदेचे सर्व सदस्य आपले पद रिक्त करतील.

नियम इत्यादी चालू राहणे, अधिकार, कर्तव्ये इत्यादी निहित होणे.

**४०.** या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, आणि संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(१) मुंबई पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५३ अन्वये करण्यात आलेले किंवा जारी केलेले १९५३ चा आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असलेले सर्व नियम, ६८. विनियम, आदेश आणि अधिसूचना या, राज्य शासन किंवा, यथास्थिति, परिषद, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे करील, अशा फेरबदलास, कोणतेही असल्यास, अधीन राहून, राज्यातील उर्वरित क्षेत्रासही लागू होतील आणि त्या क्षेत्रात अंमलात येतील;

(२) कलम ३९ अन्वये विसर्जित करण्यात आलेल्या मुंबई पशुवैद्यक परिषदेचे (जिचा यात यापुढे "विसर्जित परिषद" असा निर्देश करण्यात आला आहे) सर्व हक्क, नेमलेल्या दिवशी, या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या परिषदेकडे (जिचा यात यापुढे "महाराष्ट्र परिषद" असा निर्देश करण्यात आला आहे) निहित होतील;

(३) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी विसर्जित परिषदेकडे निहित असेल अशी सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अंमलात असतील अशा सर्व मर्यादा आणि शर्ती यांस अधीन राहून, महाराष्ट्र परिषदेकडे निहित होईल;

(४) कोणत्याही कारणामुळे विसर्जित परिषदेस देय असलेल्या सर्व रकमा, महाराष्ट्र परिषदेकडून वसुलीयोग्य असतील व हा अधिनियम प्रवर्तनात आला नसता तर, विसर्जित परिषदेस जी कोणतीही उपाययोजना किंवा कार्यवाही करता आली असती अशी कोणतीही उपाययोजना किंवा कार्यवाही करण्यास उक्त परिषद सक्षम असेल;

(५) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी आणि उक्त दिवशी अस्तित्वात असलेल्या, विसर्जित परिषदेस असलेली किंवा तिच्या वतीने घेण्यात आलेली सर्व ऋणे, दायित्वे आणि बंधने ही, या अधिनियमाद्वारे महाराष्ट्र परिषदेस प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र परिषदेने घेतलेली ऋणे, दायित्वे व बंधने असल्याचे समजण्यात येईल आणि तद्नुसार ती प्रवर्तनात असण्याचे चालू राहील;

१९५३ चा ६८. (६) मुंबई पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५३ अन्वये नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी कोणत्याही प्राधिकरणापुढे किंवा अधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेले सर्व कामकाज आणि बाबी या, असे कामकाज किंवा बाबी दाखल करून घेण्यास सक्षम असेल अशा या अधिनियमाखालील तत्सम प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे आणि त्यांच्यापुढे चालू असल्याचे समजण्यात येईल;

(७) विसर्जित परिषदेकडून किंवा तिच्या वतीने किंवा तिच्या विरुद्ध दाखल केलेले सर्व खटले आणि विसर्जित परिषदेकडून किंवा तिच्या वतीने किंवा तिच्या विरुद्ध किंवा विसर्जित परिषदेच्या वतीने अशा परिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेले दावे आणि इतर वैध कार्यवाही नेमलेल्या दिवशी प्रलंबित असेल तर, महाराष्ट्र परिषदेकडून किंवा तिच्याविरुद्ध चालू राहतील;

(८) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी पद धारण करणारे (प्रबंधक आणि सरकारी कर्मचारी असेल असा इतर कोणताही अधिकारी आणि कर्मचारी खेरीजकरून) विसर्जित परिषदेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी हे, महाराष्ट्र परिषदेत सेवा करण्यासाठी नेमण्यात आलेले अधिकारी आणि कर्मचारी असल्याचे समजण्यात येईल आणि ते, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार अन्यथा तरतूद करण्यात येईपर्यंत, वेतन व भत्ते घेतील आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी ते ज्या शर्तीस अधीन होते आणि त्यांना जो लाभ मिळण्याचा हक्क होता त्या सेवेच्या शर्ती किंवा सेवानिवृत्ती लाभ यांस अधीन असतील:

परंतु, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अशा अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी केलेली सेवा, महाराष्ट्र परिषदेखाली केलेली सेवा असल्याचे समजण्यात येईल :

आणखी असे की, या खंडातील कोणत्याही गोष्टीमुळे, असा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यासंबंधात, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने महाराष्ट्र परिषद निश्चित करील अशी नुकसान भरपाईची वाजवी रक्कम दिल्यानंतर, महाराष्ट्र परिषदेस त्याच्या सेवा समाप्तीचा कोणताही आदेश काढण्यास प्रतिबंध होतो, असे समजता कामा नये.

## अनुसूची

(कलमे १८, २६ आणि ३३ पहा)

### मान्यताप्राप्त पशुवैद्यकीय अर्हता

### भाग एक-भारतातील परिसंस्थांनी मान्यता दिलेल्या पशुवैद्यकीय पदव्या आणि पदविका

| अनु-क्रमांक | परिसंस्था | अर्हता | नोंदणीकरिता संक्षेपाक्षर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | आग्रा विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी. | बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्. |
| २ | आंध्र विद्यापीठ .. | वरीलप्रमाणे | .. वरीलप्रमाणे. |
| ३ | बिहार विद्यापीठ .. | वरीलप्रमाणे | .. वरीलप्रमाणे. |
| ४ | मुंबई विद्यापीठ .. | (१) बॅचलर ऑफ सायन्स (व्हेटरनरी)<br>(२) बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स<br>(३) बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी. | .. बी. एस्सी. (व्हेटरनरी)<br>.. बी. व्ही. एस्सी.<br>बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्. |
| ५ | कलकत्ता विद्यापीठ | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स | .. बी. व्ही. एस्सी. |
| ६ | गौहत्ती विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी | बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्. |
| ७ | केरळ विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स.. | .. बी. व्ही. एस्सी. |
| ८ | मद्रास विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स.. | .. बी. व्ही. एस्सी. |
| ९ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | (१) बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी.<br>(२) बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स | बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्.<br>.. बी. व्ही. एस्सी. |
| १० | उस्मानिया विद्यापीठ | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स.. | .. बी. व्ही. एस्सी. |
| ११ | पंजाब विद्यापीठ .. | वरीलप्रमाणे .. .. | .. वरीलप्रमाणे. |
| १२ | पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला. | (१) बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी.<br>(२) बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स | बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्.<br>.. बी. व्ही. एस्सी. |

## अनुसूची-चालू

| अनु-क्रमांक | परिसंस्था | अर्हता | नोंदणीकरिता संक्षेपाक्षर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १३ | राजस्थान विद्यापीठ | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी. | बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्. |
| १४ | सागर विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स.. .. | बी. व्ही. एस्सी. |
| १५ | उत्कल विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी. | बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्. |
| १६ | विक्रम विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स अँड ॲनिमल हजबंडरी. | बी. व्ही. एस्सी. अँड ए. एच्. |
| १७ | आसाम पशुवैद्यक .. महाविद्यालय. | ग्रॅज्युएट इन व्हेटरनरी सायन्स .. | जी. व्ही. एस्सी. |
| १८ | बंगाल पशुवैद्यक महाविद्यालय. | (एक) ग्रॅज्युएट ऑफ बेंगॉल व्हेटरनरी कॉलेज<br>(दोन) ग्रॅज्युएट इन व्हेटरनरी सायन्स .. | जी. बी. व्ही. सी.<br>जी. व्ही. एस्सी. |
| १९ | बिहार पशुवैद्यक महाविद्यालय. | ग्रॅज्युएट ऑफ बिहार व्हेटरनरी कॉलेज | जी. बी. व्ही. सी. |
| २० | मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय. | (एक) ग्रॅज्युएट ऑफ बॉम्बे व्हेटरनरी कॉलेज<br>(दोन) टू इयर डिप्लोमा सर्टिफिकेट .. | जी. बी. व्ही. सी. |
| २१ | मद्रास पशुवैद्यक महाविद्यालय. | ग्रॅज्युएट ऑफ मद्रास व्हेटरनरी कॉलेज | जी. एम्. व्ही. सी. |
| २२ | पंजाब पशुवैद्यक महा-विद्यालय (लाहोर). | (एक) लायसेन्स व्हेटरनरी प्रॅक्टिशनर ..<br>(दोन) ग्रॅज्युएट ऑफ पंजाब व्हेटरनरी कॉलेज | एल. व्ही. पी.<br>जी. पी. व्ही. सी. |
| २३ | नागपूर विद्यापीठ .. | बॅचलर ऑफ सायन्स (व्हेटरनरी) .. | बी. एस्सी. (व्हेटरनरी) |
| २४ | नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय. | टू इयर डिप्लोमा सर्टिफिकेट .. .. | ... |

## भाग दोन—भारताबाहेरील परिसंस्थांनी मान्यता दिलेल्या पशुवैद्यकीय अर्हता

| अनु-क्रमांक | परिसंस्था | अर्हता | नोंदणीकरिता संक्षेपाक्षर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | युनायटेड किंग्डम-मधील परिसंस्था. | मेम्बर ऑफ दि रॉयल कॉलेज ऑफ व्हेटरनरी सर्जन्स, लंडन. | एम.आर.सी.व्ही. |
| २ | राष्ट्रकुल देशातील विद्यापीठे. | डॉक्टर्स ऑफ व्हेटरनरी मेडिसिन ऑर बॅचलर्स ऑफ व्हेटरनरी सायन्स. | ... |
| ३ | यू. एस. ए. मधील परिसंस्था. | डॉक्टरर्स ऑफ व्हेटरनरी मेडिसिन | |

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६